<u>वॉटर कुलर्स व वॉटर प्युरिफायर</u>

दुरूस्ती व देखभाल करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील न्यायसंकुल इमारतीमध्ये ११ वॉटर कुलर्स व १४ वॉटर प्युरिफायर्स व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयांतील इमारतींमध्ये ३० वॉटर कुलर्स व २८ वॉटर प्युरिफायर्स असे एकूण ४१ वॉटर कुलर्स व ४२ वॉटर प्युरिफायर्स बसविणेत आलेले आहेत. त्यांचा दुरूस्ती व देखभाल **करार हा दोन वर्षांकरीता** करणेचा असलेने स्थानिक पातळीवर मोहोरबंद दरपत्रक (निविदा) मागविणेत येत आहेत. तरी इच्छूक सेवाधारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाले पासून आठ दिवसांचे आत सर्व वॉटर कुलर्स व वॉटर प्युरिफायर्सची पाहणी व माहिती घेणेकरिता मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील इमारत विभाग येथे प्रत्यक्ष भेट देऊन सदरची निविदा भरणेची आहे. नोंदणीकृत व इच्छूक सेवाधारकांकडून सदरची जाहीरात प्रसिध्द झालेपासून दिनांक **<u>२९/०६/२०२६</u>** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत मोहोरबंद निविदा सादर करावयाच्या आहेत. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी. ज्यांना निविदा भरणेचे आहेत त्यांनी खालील अटीस पात्र राहून दिनांक **<u>२९/०६/२०२६</u>** रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहोचतील अशा रितीने निविदा सादर कराव्यात.

हुकूमावरुन,

सहा.अधिक्षक (वित्त विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर

दिनांक- २०/०६/२०२६

<u>वॉटर कुलर्स व वॉटर प्युरिफायर्स दुरुस्ती व देखभाल करणेसाठीचे नियम व अटी खालीलप्रमाणे</u> -

०१.	निविदाधारकांनी जी.एस.टी. नंबर असणे आवश्यक आहे. निविदेचे दर समान असलेस जी.एस.टी. नंबर असलेल्या निविदाधारकास प्राधान्य दिले जाईल.
०२.	सदरहू निविदा कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांना राखून ठेवले आहेत.
०३.	कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर यांनी स्वत:कडे ठेवला आहे.
०४.	महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील निविदाधारकांनी निविदा भरु नयेत, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

०५.	वॉटर कुलर्स व वॉटर प्युरिफायर्स दुरुस्ती व देखभाल करणेसाठी येणारा खर्च निविदेमध्ये भरावा. नंतर वेगळा चार्ज दिला जाणार नाही.
०६.	वॉटर कुलर्स व वॉटर प्युरिफायर्स दुरुस्ती करणेकरीता वेगळा सर्व्हीस चार्ज दिला जाणार नाही.
०७.	निविदाधारकांनी प्रत्येक वॉटर कुलर व वॉटर प्युरिफायरचे दुरुस्तीचे दर तसेच जी.एस.टी. टक्केवारी वेगवेगळी नमूद करावी.
०८.	सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या न्यायालयाचे (http://ecourts.gov.in/kolhapur) या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आली आहे.
०९.	दरपत्रक मंजूर झाल्यावर संबंधितांना ५००/- रूपयाचे बॉन्ड पेपरवर आपला करार करून द्यावा लागेल व सदरहू ५००/- रूपयाचे बॉन्ड पेपरचा खर्च संबंधीतांस सोसावा लागेल. सदरचा करार हा कराराचे दिनांकापासून दोन वर्षांचा राहील.
१०.	देखभाल/दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की, (G.S.T., Income Tax etc.) दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधीत सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधीतास अदा करणेत येणार नाहीत.
११.	वॉटर कुलर्स व वॉटर प्युरिफायर्स तसेच त्याचे इतर साहित्याची सर्वसमावेशक (Comprehensive) देखभाल/दुरूस्ती करार असल्यामुळे त्यांची विविध सुटे पार्ट दुरुस्त करणे व दुरूस्त न झाल्यास बदलून देणे करारामध्ये समाविष्ठ राहतील, त्याबाबतचे वेगळे देयक अदा केले जाणार नाही.
१२.	देयक हे त्रैमासिक पध्दतीने सादर करावे व सादर केल्यावर नियमानुसार अदा करणेत येईल.
१३.	देयक हे संपूर्ण तपशिलासह या कार्यालयाला सादर करावे लागेल.
१४.	राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून देयक अदा करणेत येईल.
१५.	एखाद्या निविदाधारकाविरुध्द खरेदी प्रक्रियेसंदर्भात दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला असल्यास त्यांनी निविदा भरु नये, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कारवाई केली जाईल.

<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>

१) संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते की, सदरील निविदा जिल्हा न्यायालय, कोल्हापूरचे (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशित करणेत यावी.

२) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्त्याखालील न्यायालयातील वॉटर कुलर्स व वॉटर प्युरिफायर्सची माहिती

अ.क्र.	न्यायालयाचे नांव	वॉटर कुलर्स	वॉटर प्युरिफायर्स
१	जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर	११	१४
२	जिल्हा न्यायालय, इचलकरंजी	१	१
३	दिवाणी न्यायालय, व.स्तर, इचलकरंजी	२	२
४	दिवाणी न्यायालय, क.स्तर, इचलकरंजी	२	२
५	जिल्हा न्यायालय, जयसिंगपूर	२	२
६	जिल्हा न्यायालय, गडहिंग्लज	४	४
७	दिवाणी न्यायालय, क.स्तर, आजरा	१	१
८	दिवाणी न्यायालय, क.स्तर, चंदगड	१	-
९	दिवाणी न्यायालय, क.स्तर, कागल	३	३
१०	दिवाणी न्यायालय, क.स्तर, गारगोटी	२	२
११	दिवाणी न्यायालय, क.स्तर, राधानगरी	३	२
१२	दिवाणी न्यायालय, क.स्तर, पन्हाळा	२	२
१३	दिवाणी न्यायालय, क.स्तर, मलकापूर-शाहुवाडी	३	३
१४	दिवाणी न्यायालय, क.स्तर, कळे-खेरीवडे	१	१
१५	दिवाणी न्यायालय, क.स्तर, कुरुंदवाड	२	२
१६	दिवाणी न्यायालय, क.स्तर, पेठवडगांव	१	१
	एकूण	४१	४२